[illegible]
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि - 08-02-2020

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा दिक्षांत समारंभ ६ फेब्रुवारीला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील दीक्षांत समारंभ गुरुवार (६ फेब्रुवारी) रोजी होणार आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान राज्याचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी भूषविणार आहेत. तर विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन प्रमुख उपस्थित असणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. यामध्ये २०१९-२० मधील स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येणार आहेत. दीक्षांत समारंभाच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी परिपत्रकाद्वारे दिली.

# विद्यापीठात शुक्रवारपासून राज्यशास्त्र परिषद

## तज्ज्ञ करणार मार्गदर्शन; ३०० जणांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३७ वे अधिवेशन शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी (दि. १०) आणि शनिवारी (दि. ११) होणार आहे. त्यामध्ये 'राज्यशास्त्रमधील समकालीन समस्या' या विषयावर विचारमंथन होणार आहे. राज्यभरातील ३०० प्राध्यापक, अभ्यासक, संशोधक विद्यार्थी या अधिवेशनात सहभागी होणार असल्याची माहिती राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे, अधिष्ठाता प्रा. डॉ. भारती पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वि. स. खांडेकर भाषाभवनमध्ये शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता खासदार प्रा. संजय मंडलिक यांच्या उपस्थितीत उद्घाटन होणार असून, अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. डॉ. विलास आवारी हे संमेलनाध्यक्ष आहेत. शनिवारी दुपारी १२.३० वाजता अधिवेशनाचा समारोप होईल. राज्यशास्त्र विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित या अधिवेशनात मोईन शाकीर, भा. ल. भोळे आणि यशवंत सुमंत स्मृतिव्याख्यानमालेत राजन हर्षे मार्गदर्शन करणार आहेत.

# सहा फेब्रुवारीला शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ

## राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, भूषण पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ ६ फेब्रुवारीला होणार आहे. या कार्यक्रमासाठी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंग कोश्यारी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्यावतीने त्याबाबतची रितसर अधिसूचना मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या दीक्षान्त समारंभामध्ये सन २०१९-२० मधील स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे.



विद्यापीठाच्या दीक्षान्त विभागाने ऑगस्टमध्ये केलेल्या आवाहनानुसार पदवी प्रमाणपत्रासाठी या विभागाकडे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत ५४ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत.

तांत्रिक अडचण आणि पुनर्मूल्यांकनाचे निकाल उशिरा जाहीर झाल्याने काही विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यास अडचण आली होती. त्यामुळे त्यांनी अर्ज दाखल केले नव्हते. हे लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळावे, यासाठी अर्ज करण्यासाठी अतिविलंब शुल्क आणि आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करण्याची मुदत ३ डिसेंबरपर्यंत वाढविली होती.

या मुदतीत सुमारे एक हजार अर्ज वाढले असल्याची माहिती संबंधित विभागाकडून प्राप्त झाली आहे. ५६ व्या दीक्षान्त समारंभाबाबतची अधिसूचना परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी प्रसिद्ध केली. दरम्यान, दीक्षान्त समारंभाबाबत आवश्यक ती पूर्वतयारी विद्यापीठ प्रशासनाने सुरु केली आहे.

# विद्यापीठात आज 'आविष्कार' महोत्सव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ स्तरावरील 'आविष्कार' हा संशोधन महोत्सव आज, बुधवारी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात होणार आहे. संशोधनाला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवात विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठाचे अधिविभागातील विद्यार्थी, शिक्षक संशोधन सादर करणार आहेत. मानव्य शास्त्रे, भाषा व ललित कला, वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा, शुद्ध विज्ञान, शेती व पशुसंवर्धन, अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वैद्यक व औषधनिर्माण या गटांमध्ये महोत्सव होणार आहे. कोणत्याही शाखेत शिकत असणारा विद्यार्थी आपले संशोधन सादर करु शकतो. विद्यापीठ फेरीतून निवडलेले विद्यार्थी मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय महोत्सवात सहभागी होतील.

# राज्यशास्त्र विभागात राष्ट्रीय चर्चासत्र


म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १० व ११ जानेवारी रोजी आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आणि महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३७ वे अधिवेशन असा संयुक्त कार्यक्रम आयोजित केला आहे. 'राज्यशास्त्रामधील समकालीन समस्या' या मुख्य विषयाभोवती चर्चासत्र व अधिवेशनात चर्चा होणार आहे, अशी माहिती अधिविभाग प्रमुख डॉ. रविंद्र भणगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

१० जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता खासदार संजय मंडलिक यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ.डी. टी.शिर्के असतील. संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ.विलास आवारी उपस्थित राहणार आहेत. मोईन शाकीर यांच्यासह माजी कुलगुरू डॉ. राजन हर्षे यावेळी संबोधीत करणार आहेत. अधिवेशनास हुतात्मा संकुलाचे प्रमुख वैभव नायकवडी यांच्यासह डॉ. अशोक चौसाळकर, डॉ.वासंती रासम उपस्थित राहणार आहेत.

# दीक्षान्त समारंभ सहा फेब्रुवारीला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ येत्या सहा फेब्रुवारी रोजी होणार आहे. विद्यापीठ प्रशासनाकडून दीक्षान्त समारंभाच्या तयारीला सुरुवात झाली आहे. प्रशासकीय पातळीवर बैठका घेऊन अधिकाऱ्यांवर कामाची जबाबदारी निश्चित केली जात आहे. परीक्षा विभागातील लगबग वाढली आहे. यंदाच्या दीक्षान्त समारंभाला



राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन हे प्रमुख पाहुणे असणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. गेले दोन दिवस तयारीने वेग घेतला आहे.

# सरोजिनी बाबरांमुळे बहुजन स्त्रीला आत्मभान

## विद्यापीठातील चर्चासत्रात डॉ. गवस यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'कर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्वातून बहुजन स्त्रीला आत्मभान प्रदान करण्याचे कार्य डॉ. सरोजिनी बाबर यांनी केले,' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'सरोजिनी बाबर: कार्य व संशोधन लेखन' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र सभागृहात झालेल्या या चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. यावेळी डॉ. बाबर यांच्या भगिनी कुमुदिनी पवार यांचे नातू करण पवार प्रमुख उपस्थित होते.



डॉ. राजन गवस

डॉ. गवस म्हणाले, 'डॉ. बाबर या बहुजन समाजातील कर्तृत्ववान स्त्री तर होत्याच, शिवाय, लोकज्ञानाचा संचय करणारी कर्तबगार संशोधक आणि गोतावळा जपण्याची वृत्ती असणारी उत्तम माणूसपणा हाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अभिन्न घटक होता. या तिहेरी भूमिकांत वावरत असताना साहित्य, संशोधन, राजकारण, समाजकारण अशा विविध क्षेत्रांत त्यांनी आपले योगदान दिले. त्या माध्यमातून समाजाला काही ना काही देण्याचा कसोशीने प्रयत्न केला. हे सर्व त्यांनी कोणत्याही मान्यतेसाठी केले नाही. किंबहुना, मान्यतेला नकार देऊन स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्यामध्ये जसे दलित साहित्य यशस्वी झाले, तसेच मान्यतेचे निकष बाजूला ठेवून काम करणाऱ्यांत सरोजिनी बाबर यांचे नाव अग्रेसर आहे.'

डॉ. जयसिंगराव पवार यांनी डॉ. बाबर यांच्या आठवणींना उजाळा दिला. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले.

# रसाळ यांना म. सु. पाटील पुरस्कार

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मराठीतील प्रसिद्ध समीक्षक म. सु. पाटील यांच्या नावाने दिला जाणारा 'म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना जाहीर झाला. ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते १७ जानेवारीस हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. दरम्यान, मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने विद्यापीठात विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे.

मराठीतील प्रसिद्ध समीक्षक म. सु. पाटील यांच्या नावाने यावर्षीपासून शिवाजी विद्यापीठाच्यावतीने 'म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार देण्याची सुरुवात केली आहे. पहिलाच पुरस्कार समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना प्रदान केला जाणार आहे. हा कार्यक्रम १७ जानेवारीस शिवाजी विद्यापीठाच्या शाहू सिनेट सभागृहात दुपारी चार वाजता होणार आहे. कवी वसंत

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

## भाषा संवर्धन पंधरवडा कार्यक्रमात पुरस्कार वितरण

आबाजी डहाके यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे. या पंधरवड्यात विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना मराठी विषयातील संधींची माहिती दिली जाणार आहे. या विद्यार्थ्यांना वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय, ग्रंथालय दाखवले जाणार आहे. त्याचबरोबर भाषा प्रयोगशाळेत होणाऱ्या संशोधनाची माहिती दिली जाणार आहे. भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त

### खोत यांच्याशी संवाद

भाषा संवर्धन दिनानिमित्त १३ जानेवारीस 'लेखक-विद्यार्थी संवाद' आयोजित केला आहे. हा कार्यक्रम दसरा चौकातील शाहू स्मारक भवनातील मिनी सभागृहात होणार आहे. या कार्यक्रमात लेखक कृष्णात खोत आणि दगडू पाटील यांच्याशी विद्यार्थी संवाद साधणार आहेत.

सात जानेवारीला ग्रंथदिंडीचे आयोजन केले आहे. विद्यापीठात मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन होणार आहे.

मराठी विभागाने 'युनिकोड व विकीपीडिया कार्यशाळा' नऊ जानेवारीस कागल येथील डी. आर. माने महाविद्यालयात होणार आहे. बेंगलोर येथील सेंटर फॉर इंटरनेट अँड सोसायटी यांच्यासोबत कार्यशाळेत सुबोध कुलकर्णी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. दहा जानेवारीला नाइट कॉलेज येथे 'प्रमाण मराठी लेखन कार्यशाळा' होणार आहे. याच दिवशी सकाळी ११ वाजता मराठी विभागात प्राचार्य डॉ. अशोक बाबर यांच्या हस्ते किरण गुरव यांच्या 'जुगाड' कादंबरीची द्वितीयावृत्ती आणि 'श्वासोच्छ्वासाच्या मध्यंतरातील कविता' या रघुनाथ कडाकणे यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन होणार आहे. 'मी आणि माझी कविता' हा कवितांचा कार्यक्रम १६ जानेवारीस आयोजित केला आहे. शिद्यापीठाच्या मराठी भाषा विभागात होणाऱ्या कार्यक्रमात माया नारकर, योजना यादव, सुनीता बोरडे, मीरा सहस्रबुद्धे सहभागी होणार आहेत, अशी माहिती मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे आणि कार्यक्रम समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

# महात्मा गांधी यांच्यामुळे भारतीय राजकारणाला नैतिक अधिष्ठान

## प्रा. न. गो. राजूरकर; डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमाला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय राजकारणाला नैतिक अधिष्ठान प्रदान करून त्याचे महत्त्व अधोरेखित करण्याचे कार्य महात्मा गांधी यांनी केले, असे प्रतिपादन हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाचे माजी प्रा. डॉ. न. गो. राजूरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रामार्फत आयोजित प्रा. डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यान मालेअंतर्गत 'महात्मा गांधींचे राजकीय नेतृत्व' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत व राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर होते. डॉ. राजूरकर म्हणाले, समकालीन राजकारणामध्ये सर्व प्रकारच्या नैतिकतेला मागचे स्थान असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी यांच्या राजकारणाकडे पाहिले असता आदर्श राजकारणाचे ते मूर्तिमंत प्रतीक असल्याचे दिसून येते. भारतीय राजकारणात प्रवेश करीत असताना ओळख निर्माण करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते; परंतु पुढच्या पाच वर्षांत इथल्या प्रत्येक सर्वसामान्यांपर्यंत गांधीजी पोहोचू शकले. कारण, त्यांच्या प्रश्नांची ठाम उत्तरे गांधीजींकडे होती. हे त्यांच्या राजकारणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.



**शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे आयोजित उषा मेहता व्याख्यानमालेत बोलताना डॉ. न. गो. राजूरकर.**

अध्यक्षीय मनोगतात डॉ. चौसाळकर यांनी लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या संबंधांवर भाष्य करत त्या विषयीचे गैरसमज दूर केले. आजच्या पिढीला महात्मा गांधींच्या विचारांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. श्रेयस मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

शासकीय तंत्रनि
(महाराष्ट्र शासना
केंद्र शासन पुरस्कृत अपं

# ६ फेब्रुवारीला शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. दीक्षान्त समारंभासाठी ६० हजारांहून अधिक पदवीसाठीचे अर्ज आले आहेत. विद्यापीठ परीक्षा विभागाकडून दीक्षान्त समारंभाची तयारी सुरू झाली आहे.



महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार यावर्षीचा दीक्षान्त समारंभ ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) उपाध्यक्ष प्रा.डॉ. भूषण पटवर्धन उपस्थित राहणार आहेत.

समारंभाची एक महिना अगोदर

अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. विद्यापीठात अधिविभाग स्तरावरील दीक्षान्त समारंभाची पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जातील. त्या-त्या महाविद्यालयातही दीक्षान्त समारंभाचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली

# विद्यापीठात शुक्रवारपासून राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

## राज्यशास्त्र विभाग सुवर्णमहोत्सव वर्ष; २०० विचारवंतांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**


शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अधिविभाग व शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० व ११ जानेवारी रोजी वि. स. खांडेकर भाषा भवन येथे दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३७ वे अधिवेशन असा संयुक्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती विद्यापीठ राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

'राज्यशास्त्रामधील समकालीन समस्या' या मुख्य विषयावर चर्चासत्र व अधिवेशनात चर्चा होणार आहे. १० जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता खा. संजय मंडलिक यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के असतील. संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. विलास आवारी उपस्थित राहणार आहेत. मोईन शाकीर, भा. ल. भोळे यांच्यासह अलाहाबाद विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजन हर्षे यावेळी संबोधित करणार आहेत. 'आंतरराष्ट्रीय राजकारणातील समकालीन समस्या, राजकीय विचार व समकालीन प्रस्तुता' या विषयावरील चर्चासत्र होणार आहेत. शनिवारी (दि. ११) हुतात्मा सहकार समूहाचे प्रमुख वैभव नायकवडी यांच्या प्रमुख उपस्थितीत समारोप कार्यक्रम होणार आहे. याच दिवशी दुपारी तीन वाजता माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. पत्रकार परिषदेला डॉ. भारती पाटील, प्रा. डॉ. प्रकाश पवार, डॉ. टी. एम. पाटील, डॉ. विजय देठे, डॉ. प्रवीण कोडोलीकर आदी उपस्थित होते.

# दिव्यांगांच्या अभ्यासक्रमाची पुस्तके आता होणार बोलकी

## ॲक्सिसेबल स्टडी मटेरियलने ज्ञानार्जन सुलभ

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**




शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण विभागाच्या अभ्यासक्रमाच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना आता सर्वसमावेशी शिक्षण संशोधन केंद्रातर्फे ॲक्सिसेबल स्टडी मटेरियल (ऑडिबल स्वरूपात) उपलब्ध करून दिले जाणार आहे. ही पुस्तके तयार करण्यासाठी अर्थशास्त्र विभागाच्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमाची पुस्तके बोलकी होणार असून, दिव्यांग विद्यार्थ्यांसमोरील अडचणी आता कमी होणार आहेत.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांना यापूर्वी स्टडी मटेरियल (सीम) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून पान २ वर ▸

“

दूरशिक्षण पद्धतीने अंध विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण घेताना क्रमिक पुस्तके उपलब्ध होत नव्हती. ती आता ॲक्सिसेबल फॉर्ममध्ये मिळणार आहेत. त्यामुळे जास्तीत जास्त दिव्यांग पदवीचे शिक्षण पूर्ण करू शकतील.

- **डॉ. नमिता खोत**, संचालक, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र

# दिव्यांगांच्या अभ्यासक्रमाची पुस्तके आता होणार बोलकी

**(पान १ वरून)** दिले जात होते. मात्र, दिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांना या पुस्तकांचा लाभ घेता येत नसल्याने पदवी घेण्यात अनेक अडचणी येत होत्या. याचा विचार करून बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व सर्वसमावेशी शिक्षण संशोधन केंद्राने अनोखा प्रकल्प हाती घेतला आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांना ॲक्सिसेबल फॉर्ममध्ये बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.बी.ए.चे स्टडी मटेरियल उपलब्ध करून दिले जाणार आहे. अर्थशास्त्र विभागातील दिव्यांग विद्यार्थी संतोष परीट याने ॲक्सिसेबल स्टडी मटेरियल तयार करण्यासाठी मदत केली आहे. अंध विद्यार्थ्यांना स्क्रीनरीडर सॉफ्टवेअर, नॉन व्हिज्युअल डेक्सटॉप ॲक्सेस (एनव्हीडीए) च्या माध्यमातून पुस्तकांचा मोबाईलवरही लाभ घेता येणार आहे. मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत पुस्तके असणार आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांतील दिव्यांग विद्यार्थ्यांनाही याचा फायदा होणार आहे.

# सरोजिनी बाबर यांच्याकडून बहुजन स्त्रीला आत्मभान देण्याचे कार्य : डॉ. राजन गवस

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्वकर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्वातून बहुजन स्त्रीला आत्मभान प्रदान करण्याचे कार्य डॉ. सरोजिनी बाबर यांनी केले, असे गौरवोद्गार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी काढले.

शिवाजी विद्यापीठ यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'सरोजिनी बाबर : कार्य व संशोधन लेखन' या विषयावरील एकदिवसीय चर्चासत्रात बीजभाषण करताना डॉ. गवस बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. बाबर यांच्या भगिनी कुमुदिनी पवार यांचे नातू करण पवार प्रमुख उपस्थित होते. डॉ. गवस म्हणाले, डॉ. बाबर या बहुजन समाजातील कर्तृत्ववान स्त्री होत्या, शिवाय लोकज्ञानाचा संचय करणारी कर्तबगार संशोधक होत्या.



**कोल्हापूर : डॉ. सरोजिनी बाबर यांच्या कार्याविषयी आयोजित चर्चासत्रात बोलताना डॉ. राजन गवस.**

डॉ. सरोजिनी बाबर यांचा मनःपिंड घडविण्यात कर्मवीर भाऊराव पाटील व साने गुरूजी यांचे मोठे योगदान असून त्यांच्या प्रेरणेनेच अक्कांना लोकसाहित्यातील संशोधनाची प्रेरणा मिळाली. माणूस आणि माती यांचे ऋणानुबंध जपले तरच माणूसपण खऱ्या अर्थाने समृद्ध होईल, अशी त्यांची धारणा होती. त्यातूनच त्यांनी वंचितांच्या प्रश्नांना मिळेल त्या व्यासपीठावर वाचा फोडली.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, डॉ. सरोजिनी बाबर लोकसाहित्याच्या संशोधक म्हणून त्या जितक्या मोठ्या होत्या, तितक्याच एक सहृदयी व्यक्ती म्हणून ही मोठ्या होत्या.

वैशाली भोसले यांनी शुभ संदेशांचे व संजय पाटील यांनी कुमुदिनी पवार यांच्या मनोगताचे वाचन केले. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले.

# विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १० व ११ जानेवारी रोजी आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र व महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३७ वे अधिवेशन असा संयुक्त कार्यक्रम आयोजित केला आहे. 'राज्यशास्त्रमधील समकालीन समस्या' या मुख्य विषयाभोवती चर्चासत्र व अधिवेशनात चर्चा होणार आहे, अशी माहिती अधिविभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

अधिवेशनास वैभव नायकवडी यांच्यासह डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. वासंती रासम, डॉ. पी. डी. देवरे, डॉ. प्रशांत अमृतकर, डॉ. प्रमोद पवार, डॉ. मोहन काशीकर, डॉ. राजेश खरात, डॉ. भालबा विभूते, डॉ. डी. यू. पवार, डॉ. बी. बी. पाटील, डॉ. सिकंदर जमादार, डॉ. बाळासाहेब भोसले आदी उपस्थित राहणार आहेत. पत्रकार परिषदेस अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांच्यासह डॉ. टी. एम. पाटील, डॉ. विजय देठे, डॉ. प्रवीण कोडोलीकर आदी उपस्थित होते.

# राज्यशास्त्र विभागातर्फे शनिवारपासून राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता.७ : शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (ता.१०) आणि शनिवारी (ता.११) दोनदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. तसेच महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे ३७ वे अधिवेशनही याच कालावधीत होईल. 'राज्यशास्त्रामधील समकालीन समस्या' या मुख्य विषयाभोवती चर्चासत्र व अधिवेशनात चर्चा होणार आहे. ही सर्व सत्रे वि.स.खांडेकर भाषा भवन येथे होतील, अशी माहिती अधिविभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांनी आज येथे दिली.

डॉ. भणगे म्हणाले, 'शुक्रवारी (ता.१०) सकाळी १० वाजता खासदार संजय मंडलिक यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन होईल. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ.विलास आवारी उपस्थित राहणार आहेत. मोईन शाकीर, भा.ल.भोळे यांच्यासह माजी कुलगुरू डॉ. राजन हर्षे यावेळी संबोधित करणार आहेत.

## व्याख्यानाचे आयोजन

शुक्रवारी (ता.१०) दुपारी ४ वाजता याच ठिकाणी मोईन शाकीर, भा.ल.भोळे व यशवंत सुंमत स्मृती व्याख्यानमाला होणार आहे. यामध्ये अलाहबाद विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.राजन हर्षे यांचे व्याख्यान होईल. जागतिकीकरण आणि राष्ट्र राज्य या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत.

राज्यशास्त्र अधिविभागाची स्थापना ऑक्टोबर रोजी झाली. यंदाचे वर्ष राज्यशास्त्र अधिविभागाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या वर्षाची सुरवात 'गांधी विचार : राजकारण आणि धर्म' या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राने झाली. त्यानंतर वर्षभरात विभागांतर्गत विविध उपक्रम आयोजित करण्यात आल्याचेही डॉ. भणगे यांनी सांगितले.

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ ६ फेब्रुवारीला

## राज्यपालांसह, डॉ. भूषण पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाचा २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील दीक्षांत समारंभ ६ फेब्रुवारीला होणार आहे. या समारंभाला राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याबाबतचे नोटिफिकेशन आज परीक्षा नियंत्रक गजानन पळसे यांनी प्रसिद्ध केले आहे.



शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ यंदा गुरुवारी ६ फेब्रुवारीला होणार आहे.

यामध्ये २०१९ -२० मधील स्नातकांना पदवी प्रदान करण्यात येईल. प्रथेप्रमाणे कुलपती (राज्यपाल) भगतसिंग कोश्यारी यांची प्रमुख उपस्थिती दीक्षांत समारंभाला असणार आहे.

त्याचबरोबर विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन हे अतिथी म्हणून असणार आहेत.